# मनपा आयुक्तांचा सिंहस्थ आढावा

## अतिक्रमण हटवण्याचे आदेश; तपोवन, नियोजित साधुग्राम परिसराला भेट

नाशिक । प्रतिनिधी

आगामी सिंहस्थ महापर्वाच्या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त मनिषा खत्री यांनी आज पंचवटी परिसरातील विविध महत्वाच्या ठिकाणांची पाहणी करून अधिकाऱ्यांना कामाबद्दल सूचना दिल्या. त्यामध्ये साधुग्राम परिसर, तपोवन परिसर, कुंभमेळा प्रशासकीय इमारत, सिटीलिंक बसडेपो, बेघर निवारा केंद्र, बटुक हनुमान मंदिर परिसर आणि नियोजित साधूग्राम जागेचा पहाणी दौरा केला.

आयुक्त खत्री यांनी पाहणीदरम्यान अतिक्रमण हटविण्याचे आदेश देत स्वच्छता, सुरक्षितता आणि सुविधांच्या उभारणीबाबत विविध सूचना केल्या. यावेळी त्यांनी संबंधित विभागांना वेळेत काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. सिंहस्थ महापर्वात देश-विदेशातून लाखो भाविक नाशिकमध्ये येणार आहेत, त्यामुळे कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. सिंहस्थ कुंभ महापर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विभागांनी समन्वय साधत काम करावे, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच, स्वच्छतेवर विशेष भर देत भाविकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. महानगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण निर्मूलन, आरोग्य सेवा आदी क्षेत्रांत नियोजन सुरू आहे, त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी तंबी त्यांनी दिली.




सकाळी आगामी सिंहस्थ महापर्वाच्या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी साधुग्राम, तपोवन परिसरात पाहणी केली तर सायंकाळी त्यांनी गोदा वॉक उद्यानाची व रामकुंड परिसराची पाहणी केली.

### भाविकांना त्रास नको

भाविकांना कोणत्याही प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागू नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयुक्त खत्री यांनी या दौऱ्यानंतर सांगितले. यानंतर रामवाडी येथील गोदाकिनारी विकसित झालेल्या गोदा वॉक या उद्यानाची पहाणी त्यांनी केली. या भेटीदरम्यान अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल, स्मार्ट सिटी मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, उपआयुक्त (अतिक्रमण) डॉ. मयूर पाटील, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण आदी अधिकारी उपस्थित होते.

### रामकुंड परिसराची सायंकाळी पाहणी

२०२७ मध्ये नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभ महापर्वाच्या पूर्वतयारीसाठी महापालिका प्रशासन सज्ज आहे. सकाळी पाहणी करुन सायंकाळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, पंचवटी पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या समवेत रामकुंड परिसराची पहाणी देखील करण्यात आली. रामकुंड परिसरात स्मार्ट सिटी अंतर्गत सुरु असलेल्या व झालेल्या कामाची या दौऱ्यात पहाणी करुन जलद गतीने कामे पूर्ण करण्याच्या सूचना आयुक्त यांनी दिल्या.

## गोदापात्रातील काँक्रिट प्रकरणावर १६ ला सुनावणी

नाशिक । प्रतिनिधी

गोदावरी नदीला येणारा पूर नियंत्रित करण्यासाठी स्मार्ट सिटीच्या वतीने अहिल्याबाई होळकर पूल परिसरात मेकॅनिकल गेटचे काम केले जात आहे. या कामासाठी थेट नदीपात्रात काँक्रिटीकरण करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींनी या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी आता १६ जानेवारी रोजी उच्च न्यायालयात सुनावणी होणार असल्याचे याचिकाकर्ते निशिकांत पगारे यांनी सांगितले.

स्मार्ट सिटीद्वारे उभारण्यात येणाऱ्या मेकॅनिकल गेटचे काम मार्च महिन्यापर्यंत पूर्ण करण्याचा अल्टिमेटम देण्यात आल्याने या प्रकरणी न्यायालय काय आदेश मिळतात, याबाबत तर्क-वितर्क दिसून येत आहेत.

पुरामुळे नदीकाठ परिसरात पाणी जात असल्याने होणारे नुकसान टाळण्यासाठी स्मार्ट सिटीच्या वतीने २६ कोटी रुपये खर्च करत अमेरिकेच्या धर्तीवर मेकॅनिकल गेट बसविण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात काँक्रिट टाकण्याचे काम सुरु होते. या कामामुळे अहिल्याबाई होळकर पूर परिसरातून होणारा विसर्ग नियंत्रित करणे शक्य होणार असल्याचा दावा स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे.

जैवविविधेसह होळकर पुलाला धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पर्यावरणप्रेमींसह नागरिकांनी देखील यास विरोध केला आहे. या प्रकारामुळे उच्च न्यायालयात निशिकांत पगारे यांनी अवमान याचिका दाखल केली आहे. याबाबत यापूर्वी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे आदेश दिले असल्याचे वृत्त आहे.

## रक्तदान सर्वश्रेष्ठ दान : मनियार




**नाशिक ।** अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. यापेक्षा दुसरे ते श्रेष्ठ दान काय असू शकते, असे प्रतिपादन रक्तमित्र नदीम मनियार यांनी केले. सोमवारी गुलशन कॉलनी, पखाल रोड, अहमद रजा मशिद परिसरात आयोजित रक्तदान शिबीर कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तामिळ सगंमचे राममृर्ती, संविधानप्रेमीचे किरण मोहिते, वसीम पठाण, श्रीधर, आरोग्य मित्र जुबेर हाश्मी आदी उपस्थित होते. या शिबिरात ५५ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. विशेष म्हणजे ३ महिलांनीही रक्तदान केले. शिबिर यशस्वीतेसाठी तामिळ फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. जिल्हा शासकीय रुग्णालय मेट्रो रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी अनिल मोरे, डॉ. नीलकंठ भामरे, सुदाम चव्हाण, गणेश आहेर, मंगेश कुवर, लिना जाधव, राजू महरोलिया, राजकुमार मोरे आदीचे योगदान लाभले.

## डॉ. कृष्णा शहाणे यांना पुरस्कार



**नाशिकरोड ।** आर.एन.सी.आर्ट्स, जे. डी.बी. कॉमर्स अँड एन. एस.सी. सायन्स कॉलेज, नाशिकरोड, नाशिक येथील प्रोफेसर तथा अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.कृष्णा शंकर शहाणे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट कृषी लेखक पुरस्कार जाहीर झाला आहे. रावेर, जि. जळगाव येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक कृषीसेवकतर्फे कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन २ फेब्रुवारीला सन्मान करण्यात येणार आहे. डॉ. कृष्णा शहाणे हे बिटको महाविद्यालय नाशिकरोड येथे प्रोफेसर आहे. येत्या २ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता हा सन्मान सोहळा रावेर (ता. रावेर, जि. जळगाव) येथील कै. शेनाबाई गोंडू पंडित मराठा समाज मंगल कार्यालयात होत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अरुण पाटील असतील. पुरस्कार वितरण केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते होणार असून आमदार अमोल जावळे, आ.चंद्रकांत पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा कृषी अधीक्षक कुर्बान तडवी,यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## तिसरे इंद्रायणी साहित्य संमेलन

**नाशिक।** साठवायची नसते कविता तर जगायची असते कविता! अशा मार्मिक शब्दांतून कवितेतून कवितेवर भाष्य करीत शिवांजली साहित्यपीठाचे संस्थापक अध्यक्ष आणि ज्येष्ठ कविवर्य इंजि. शिवाजी चाळक यांनी तिसऱ्या एकदिवसीय इंद्रायणी साहित्य संमेलनात कवींचे प्रबोधन केले. निमंत्रितांच्या कविसंमेलनात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना चाळक बोलत होते. शब्दधन काव्यमंचाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश कंक, इंद्रायणी साहित्य संमेलनाध्यक्ष दादाभाऊ गावडे, निमंत्रक अरुण बोऱ्हाडे, स्वागताध्यक्ष वंदना आल्हाट, परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर यांची प्रमुख उपस्थिती होती. पिंपरी - चिंचवड परिसर, पुणे आणि महाराष्ट्राच्या अन्य भागांतून सुमारे ५२ कवी सहभागी झाले होते. ज्येष्ठ कवी सुरेश कंक यांनी कृष्णार्पण या आध्यात्मिक आशयाच्या कवितेचे प्रभावी सादरीकरण करीत उपस्थितांना अंतर्मुख केले. संतोष घुले यांनी चपखल काव्यपंक्ती, शेरोशायरी उद्धृत करत सुमारे दोन तास बहारदार सूत्रसंचालन केले. सहभागी कवींना प्रमाणपत्र, मानवस्त्र, गुलाबपुष्प प्रदान करून सन्मानित करण्यात आले. इंद्रायणी साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजन केले. डॉ. पौर्णिमा कोल्हे यांनी आभार मानले.

## आदिवासी विद्यार्थिनींची गैरहजेरी टळणार : आयुक्त गुंडे

### 'म होई ग बरी'अंतर्गत आश्रमशाळांना पेन रिलीफ बॅगचे वितरण



**नाशिक ।** अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. मासिक पाळीच्या दिवसांत असाह्य होणाऱ्या वेदनांमुळे विद्यार्थिनींनी मेटाकुटीला येतात. त्याचा परिणाम विद्यार्थिनींच्या शाळेतील उपस्थिती आणि शैक्षणिक कामगिरीवर होतो. विद्यार्थिनींच्या शारीरिक वेदना कमी होण्यासह वर्गातील उपस्थिती कायम राहण्यासाठी पेन रिलीफ रामबाण उपाय ठरणार आहे. त्यामुळे विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान टळणार असल्याचे प्रतिपादन आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांनी केले.

आदिवासी विकास विभागाकडून द मिलेनियम वेल्फेअर फाउंडेशनच्या मदतीने शासकीय आश्रमशाळा आणि एकलव्य रेसिडेन्सियल स्कूलमध्ये म होई ग बरी उपक्रम सुरु करण्यात आला आहे. त्याअंतर्गत आदिवासी विद्यार्थिनींना मल्टीपर्पज इलेक्ट्रिक हॉट वॉटर जेल बॅग अर्थात 'पेन रिलीफ बॅग' पुरविण्यात येत आहे. मंगळवारी (दि.७) इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शासकीय इंग्रजी माध्यम निवासी आश्रमशाळेत पेन रिलीफ बॅग वितरणाप्रसंगी आयुक्त गुंडे बोलत होत्या. यावेळी उपायुक्त विनिता सोनवणे, द मिलेनियम वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष शुभम झारिया, विनोद राठोड, ब्रँड ॲम्बेसिडर समीक्षा नन्नावरे, युएनडीपीचे लहू राठोड, सुभम झा, मुख्याध्यापक तनवीर जहांगीरदार, अधीक्षक संतोष सोनवणे, अधीक्षिका गौरीनंदा पाटील आदींसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दरम्यान, म होई ग बरी उपक्रमाच्या माध्यमातून मासिक पाळी काळातील वेदना कमी करण्यासह खेळाच्या दुखापतींपासून आणि शारीरिक अस्वस्थतेपासून विद्यार्थिनींची मुक्तता करण्यावर भर दिला जात आहे. त्या माध्यमातून राज्यातील ४९७ शासकीय आश्रमशाळा आणि ३७ एकलव्य निवासी शाळांमधील इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतच्या प्रवेशित विद्यार्थिनींसाठी मोफत ६ हजार १०० पेन रिलीफ बॅग दिल्या जाणार आहेत. या उपक्रमाचा सुमारे ५५ हजार विद्यार्थिनींना लाभ होणार आहे.

### 'हेल्पलाईन'द्वारे समुपदेशन

मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया असली तरी त्याबाबत अनेक गैरसमज आहे. या काळात विद्यार्थिनींना विविध समस्या भेडसावतात. त्या पार्श्वभूमीवर मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापनासाठी टोल फ्री हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. त्याद्वारे महिला डॉक्टर विद्यार्थिनींच्या शंकांचे निरसन व समुपदेशन करणार आहे. ही सुविधा २४ तास उपलब्ध असणार आहे.

## अपूर्ण कामे १५ मार्चपर्यंत पूर्ण करा

### अतिरिक्त सीइओ डॉ. अर्जुन गुंडे यांच्या सूचना

नाशिक । प्रतिनिधी




जिल्हा परिषदेच्या विविध विभागातंर्गत बांधकामे सुरू आहेत. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कामे पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत आहे. या वर्षातील बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, अपूर्ण कामे ही १५ मार्चपर्यंत पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी दिले.

वेळेत निधी खर्च व्हावा, यासाठी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गुंडे यांनी जिल्ह्यातील सर्व शाखा अभियंता, उपअभियंता यांची बैठक घेत, विविध विभागातंर्गत सुरू असलेल्या बांधकामांचा आढावा त्यांनी घेतला. इतर सर्व मंजूर कामे ही वेळात पूर्ण करावीत, निधी अखर्चित रहाता कामा नये, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. मार्च एण्डींगच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासन निधी खर्चासाठी सरसावली आहे. प्रशासनाने अंदाजपत्रकाची तयारी सुरू केली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण मंजूर झालेले कामे, त्यांची सद्यस्थिती, अपूर्ण कामे यांचा तालुकानिहाय सविस्तर आढावा यावेळी झाला. प्रामुख्याने अंगणवाडी कामे, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, नवीन शाळा खोल्या, शाळा दुरूस्ती याचा कामनिहाय आढावा डॉ. गुंडे यांनी घेतला. काही मंजुर कामे संथगतीने सुरू असल्याचे निर्देशनास आले. त्यावर डॉ. गुंडे यांनी विचारणा करत अडचणी जाणून घेतल्या. ही कामे वेळात न झाल्यास निधी अखर्चित राहून तो शासन दरबारी जमा होणार आहे. त्यासाठी ही कामे वेळात पूर्ण करावीत असे आदेश डॉ. गुंडे यांनी यावेळी दिले. मार्च एण्डीगंच्या पार्श्वभूमीवर कामांची व बीले काढण्याची गर्दी असते. त्याकरिता १५ मार्च पूर्वीच कामे पूर्ण करून बिले टाकण्यात यावी, असे डॉ. गुंडे यांनी सांगितले.

## एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी नियुक्ती प्रकरणावर आज सुनावणी

**नाशिक ।** एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी प्रकरणी मॅटमध्ये सुरू असलेल्या सुनावणीत सातत्याने तारीख पे तारीख सुरु असल्याने एमआयडीसीची कारभार प्रभारींच्या खांद्यावरुन सुरु असल्याने उद्योजक नाराजी व्यक्त करत आहेत.

एमआयडीसीच्या प्रत्येक निर्णयासाठी धोरणात्मक पदावर अवलंबून रहावे लागत असल्याने प्रभारींच्या कामातून केवळ कामांची गती सुरु ठेवण्याचेच काम होत आहे. सद्यस्थितीत प्रादेशिक अधिकारीपदाचा प्रभारी कार्यभार कार्यकारी अभियंता जयवंत पवार यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.

तत्कालीन प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांच्या बदलीनंतर सुरु झालेला नियुक्तीचा वाद मॅटमध्ये कमालीचा रेंगाळताना दिसून येत आहे. या संदर्भात मॅटमध्ये नियोजित सुनावणी मंगळवारी (दि.७) देखील पूर्ण होवू शकलेली नाही. याचिकाकर्ते गणेश राठोड यांच्या वकिलांची तासभर बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाकडून दीपक पाटील यांच्या वकिलाची व सरकारी वकिलांची बाजू जाणून घेण्यासाठी आता बुधवारी (दि.८) दुपारच्या सुमारास सुनावणी घेतली जाणार असल्याचे जाहीर केले.

नाशिक एमआयडीसी प्रादेशिक अधिकारीपदी नियुक्तीचे आदेश प्राप्त होवून देखील गणेश राठोड यांना रूजू करून न घेताच, त्यांच्या नियुक्तीचे आदेश रद्द ठरवित शिर्डी संस्थान येथे त्यांची नियुक्ती केली होती. तर दीपक पाटील यांची नाशिक एमआयडीसी प्रादेशिक अधिकारीपदी नियुक्ती केल्याचे आदेश काढले गेल्याने, गणेश राठोड यांनी पाटील यांच्या नियुक्तीला आव्हान देण्यासाठी मॅटमध्ये धाव घेतली. मागील काही महिन्यांपासून याप्रकरणी मॅटमध्ये सुनावणी सुरू आहे.

दरम्यान, मंगळवारी घेण्यात आलेल्या सुनावणीत गणेश राठोड यांच्या वकीलांनी काही तथ्य न्यायालयासमोर ठेवले. तब्बल तासभर सुनावणी चालल्यानंतर न्यायालयाने, दीपक पाटील आणि सरकारी वकील यांची बाजू ऐकण्यासाठी पुन्हा बुधवारी(दि.८) सुनावणी ठेवली आहे. त्यामुळे प्रादेशिक अधिकारीपदाचा फैसला समोर येण्यासाठी आणखी किती काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे, असा प्रश्न उद्योजक उपस्थित करीत आहेत.

## कथाकीर्तनोत्सवाची आज सांगता



**नाशिक ।** गंगापूररोड चैतन्यनगरमध्ये तीन दिवसीय कथा कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. कथेची आज (दि.८) सायंकाळी ७ वा. सांगता होणार आहे. वृंदावन येथील श्री गौडिया मठाचे दामोधर गोस्वामी श्रीकृष्ण हे आपल्या सुमधुर वाणीने भाविकांना कथेचे ज्ञानामृत पाजत आहेत. आपल्या रसाळ प्रवचनातून श्रोत्यांना त्यांनी मंत्रमुग्ध केले. केवळ मनाच्या एकाग्रतेने परमेश्वराचे अधिकाधिक नामस्मरण हाच समाजातील अस्थिरता व अशांततेवर रामबाण उपाय असल्याचे स्वामी म्हणाले. या ज्ञानयज्ञाचे संयोजक विलास राऊत यांनी महाराजांचा यथोचित सत्कार केला. नंदा राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## मकरसंक्रांतीसाठी पथनाट्यातून जनजागृती

नवीन नाशिक । प्रतिनिधी



मराठी विज्ञान परिषद नाशिक विभाग, नवीन नाशिक पत्रकार संघ व विभागीय पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक पतंग व दोऱ्याचा वापर करून मकरसंक्रांत साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. नायलॉन मांज्याचे घातक परिणाम जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी इंदिरानगर, पांडवनगरी, अशोकनगर, रविवार कारंजा, नवीन नाशिक , नाशिकरोड व म्हसरूळ या ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले.

नायलॉन मांज्यामुळे पक्ष्यांचे जीव धोक्यात येतात, मानवी जीविताला हानी पोहोचते आणि पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, याची जाणीव नागरिकांना करून देण्यात आली. काचलेपीत मांजाचा वापर करणाऱ्या किंवा विक्री करणाऱ्यांना चार महिन्यांचा कारावास आणि तडीपारीची शिक्षा होऊ शकते, याची माहितीही यावेळी देण्यात आली. परिसरातील नागरिकांनी आणि बालगोपाळांनी या पथनाट्यातून साध्या पतंगाचा व साध्या दोऱ्याचा वापर करण्याची शपथ घेतली. 'तीळगूळ घ्या आणि गोड बोला' या संदेशासह सण साजरा करण्याचे आवाहन मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. धनंजय अहिरे यांनी केले.

या पथनाट्याचे लेखन मानसी यांनी तर दिग्दर्शन चेतन सुशीर यांचे होते. कलाकारांमध्ये संकेत, सीमा, विश्वास, प्रणव काठावदे, कैवल्य चंद्रत्रे आणि तेजस्विनी जाधव यांचा सहभाग होता. यशस्वीतेसाठी अंबड पोलीस ठाण्याचे अशोक आव्हाड, संदीप निर्मळ, अशोक उगले, इंदिरानगर पोलीस ठाण्याचे भूषण सोनार, शीतल चौघुले, अनिल माळी, गणेश बागुल यांनी परिश्रम घेतले. आभार अजित टक्के यांनी मानले.